# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

## // विशेष महासभा बैठकीचे कार्यवृत्त // (ऑनलाईन ॲपद्वारे)

**सभा क्रं. - ३२** **दि.१३/१०/२०२१**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.१२/०५/२०२१ बुधवार रोजी सकाळी ११.३० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे) मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर. सौ.महाजन जयश्री सुनिल यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या महासभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी ऑनलाईन पध्दतीने खालील सन्मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा.सौ.महाजन जयश्री सुनिल, महापौर तथा पिठासिन अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| पाटील कुलभुषण विरभान, उपमहापौर | भोईटे लताबाई रणजीत | पाटील राजेंद्र झिपरु |
| जोहरे प्रिया मधुकर | पाटील प्रतिभा सुधीर | महाजन सुनिल सुपडु |
| पोकळे दिलीप बबनराव | कापसे मयुर चंद्रकांत | शेख शबानाबी सादीक |
| खान रूकसाना बी गबलु | कापसे प्रतिभा चंद्रकांत | नाईक प्रशांत सुरेश |
| सोनवणे कांचन विकास | देशमुख प्रतिभा गजानन | बालाणी भगतराम रावलमल |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | पाटील विजय पुंडलिक | काळे रेश्मा कुंदन |
| बाविस्कर किशोर रमेश | सोनवणे सुरेश माणिक | आहुजा मनोज नारायणदास |
| सपकाळे रंजना भरत | शेख हसीनाबी शरिफ | पाटील मिनाक्षी गोकुळ |
| कोल्हे प्रविण रामदास | भिल पार्वताबाई दामु | सोनार रंजना विजय |
| सनकत चेतन गणेश | पाटील उषा संतोष | खडके विश्वनाथ सुरेश |
| सोनवणे मुकुंदा भागवत | कोल्हे सिंधु विजय | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| भंगाळे विष्णू रामदास | कोल्हे ललीत विजय | देशमुख सुन्नाबी राजु |
| तायडे ज्योती शरद | बरडे नितीन मनोहर | पटेल इब्राहिम मुसा |
| लढ्ढा नितीन बालमुकुंद | बेंडाळे उज्वला मोहन | सोनवणे निता मंगलसिंग |
| काळे अमित पांडुरंग | राणे गायत्री इंद्रजित | सोनवणे विक्रम किसन |
| ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह | जोशी अनंत हरिश्चंद्र | **स्विकृत सदस्य** |
| सोनवणे धीरज मुरलीधर | चव्हाण ज्योती बाळासाहेब | सोनवणे कैलास नारायण |
| काळे दिपमाला मनोज | मराठे जितेंद्र भगवान | त्रिपाठी विशाल राधेशाम |
| सोनवणे अश्विन शांताराम | सोनवणे अंजनाबाई प्रभाकर | मराठे राजेंद्र नारायण |
| पाटील सचिन भिमराव | सोनवणे सुरेखा सुदाम | |
| चौधरी मनोज सुरेश | ढेकळे सदाशिव गणपत | |

सदर सभेस मा.आयुक्त, श्री.सतिश कुलकर्णी, अतिरीक्त आयुक्त.डॉ.विद्या गायकवाड ,मुख्यलेखापरिक्षक श्री.संतोष वाहुळे, नगरसचिव श्री.सुनिल गोराणे, उपायुक्त श्री.शाम गोसावी, उपायुक्त श्री.प्रशांत पाटील, मुख्यलेखाधिकारी श्री.कपील पवार, सहा.आयुक्त श्री.आकाश डोईफोडे, व सहा.आयुक्त श्री.पवन पाटील तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरू करण्याचे निर्देश दिले.**

**नगरसचिव :-** सभा क्रं. ३२ , विषयपत्रिका क्रं.३२ वरील विषयपत्रिकेवरील विषयांना सुरूवात करण्यात येत आहे.

**नगरसचिव :-** मान्यता प्राप्त गटाच्या तौलनिक संख्याबळाच्या

**श्री.ईब्राहीम पटेल :-** आपल्याला शोकॉज नोटीसपण मिळालेली आहे हे लक्षात ठेवा.

**श्री.जितेंद्र मराठे :-** आपल्याला पण मिळालेली आहे हे पण लक्षात राहू द्या.

**ॲड . शुचिता हाडा :-** कुठल्याही पध्दतीने प्रक्रीया करणे बंधनकारक आहे.

**श्री. राजेंद्र पाटील :-** याच्यासंदर्भात अपात्रतेची कारवाईची कारवाईची नोटीस मिळालेली आहे आपल्याला

**ॲड . शुचिता हाडा :-** आयुक्त साहेब , आपण शासकीय अधिकारी आहात.

**श्री. सचिन पाटील :-** याच्याबाबतीत कैक लोकांना नोटीस मिळालेली आहे.

**श्री. चेतन सनकत :-** राजुभाऊ तुम्हालाही नोटीस मिळाली आहे. राजुभाऊ ४ तारखेला नोटीस आलेली आहे तुम्हाला

**ॲड . शुचिता हाडा :-** यापुर्वी आपल्याला अपात्रतेच्या नोटीस बजाविलेल्या आहेत.

**श्री.जितेंद्र मराठे :-** हो पण ते फिरताहेत

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौरांना सुध्दा दिलेले आहे.

**श्री. सचिन पाटील :-** ताई लोकशाही पध्दतीनेच काम होत आहे.

**ॲड . शुचिता हाडा :-** त्यांनी शब्द दिलेला आहे. भारतीय जनता पार्टी कडे , आयुक्त साहेब आपण प्रशासकीय अधिकारी आहात.

**श्री. चेतन सनकत :-** महापौरताई बोलण्याची संधी द्यावी मला

**ॲड . शुचिता हाडा :-** अशा पध्दतीने जर कारभार तिथे चाललेला असेल तर या संदर्भातील आपल्यावर सुध्दा गुन्हा दाखल होईल. विभागीय आयुक्त कार्यालयात नोंदणी झालेली आहे गटनेत्यांची आणि दुसरे कोणी स्वयं गटनेते आहेत. त्यांची कुठेही नोंदणी झालेली नाही. अत्यंत महत्वाचा मुद्दा आहे हा या पध्दतीने आपण कामकाज पुढे नेवुच शकत नाही.

**श्री. राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया, आजच्या सभेमध्ये जे कामकाज चालु आहे. त्यामध्ये मनपा अधिनियम व नियमांची पायमल्ली होत आहे. ज्या नियमाच्या याच्याने सभा कामकाज चालु आहे सदरची ही सभा तहकुब करण्यात यावी.

**ॲड . शुचिता हाडा :-** मी महापौर महोदया वारंवार आपल्या निदर्शनास आणुन देते आहे , की गटनेत्यांना आधी पाचारण करायचं असत आणि त्यानंतर ही सभा होत असते. आपण सगळया नियमांची पायमल्ली लावलेली आहे. या पध्दतीने आपण सभेचे कामकाज पुढे नेवु नये आणि आम्हाला जे येथे ऐकवले जाते आहे की तुम्हाला नोटीसेस बजाविलेल्या आहेत. जे बंडखोर आहेत त्यांना यापुर्वीच आमच्या मार्फत अपात्रेच्या बाबत नोटीसेस बजावुन झालेल्या आहेत. त्या नोटीस विसरले वाटत आपण , ज्या गटनेत्यांची विभागीय आयुक्त कार्यालयात नोंदणीच झालेली नाही. त्या गटनेत्यांना आपण पाचारण करूच शकणार नाही.

**श्री. राजेंद्र पाटील :-** ताई मला कळु द्या सभागृहात पिठासीन अधिकारी काय म्हणता आम्हाला ऐकू द्या. महापौर काय म्हणताहेत ते तर ऐकू द्या.

**ॲड . शुचिता हाडा :-** त्या काही बोलतच नाहीये अजून , दिलीपभाऊ आमच्याकडे सगळी शांतता आहे . जेव्हा एकजण बालतो तेव्हा आम्ही आपोआप शांत बसतो.

**श्री. अश्विन सोनवणे :-** काहीच ऐकू येत नाहीये.

**श्री. भगत बालाणी :-** हॅलो

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौरताई आणि आयुक्त साहेब आपल्याला पुनश्च मी विनंती करते , अत्यंत काटेकोर पणे कायद्याच पालन करून आपण ही सभा पुढे न्यावी आणि आपल्याला तांत्रिक अडचणी जर दिसताहेत तर आजची सभा आपण ताबडतोब तहकुब करावी.

**श्री. भगत बालाणी :-** हॅलो , हॅलो , पोकळे साहेब तुम्हाला जर नैतिकता असेल तर माझी सर्व नगरसेवकांना माझी विनंती आहे. ओपन सांगा तुम्ही सगळे सोडून गेले आहे.

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौरताई मी आपल्याला पुन्हा विनंती करते , आयुक्त साहेब आपण महानगरपालिकेचे प्रशासकीय प्रमुख आहात. आता आपली जबाबदारी लक्षात घ्या साहेब मी पुन्हा मी पुनश्च आपल्याला विनंती करते. आपण प्रशासनाचे प्रमुख आहात. आपल्या उपस्थितीत कोणताही अनागोंदी कारभार होणे योग्य ठरणार नाही. हे सगळ आपल्यावरच येणार आहे आयुक्त साहेब , मी वारंवार आपल्याला विनंती करते आहे आयुक्त साहेब

**श्री.ईब्राहीम पटेल :-** भगतभाई
**श्री.नितीन बरडे :-** भगतभाई खुष दिसताहेत तुम्ही
**श्री.धिरज सोनवणे :-** बहुमत आहे आमच्याकडे
**श्री.नितीन बरडे :-** किती आहे
**श्री.धिरज सोनवणे :-** बहुमत आहे आमच्याकडे नितीनभाऊ आमच्याकडे बहुमत आहे.
**श्री.ईब्राहीम पटेल :-** अभिनंदन तुमच्या बहुमताचे
**श्री.नितीन बरडे :-** अभिनंदन धिरजभाऊ अभिनंदन , अरे पण भगतभाई किती दिवस गटनेता राहतील.
**श्री.धिरज सोनवणे :-** पाच वर्ष पुर्ण
**श्री. भगत बालाणी :-** पाच वर्ष
**श्री.नितीन बरडे :-** काय
**श्री. भगत बालाणी :-** पाच वर्ष
**श्री.नितीन बरडे :-** आता डिसकॉलीफाईड व्हाल तुम्ही
**श्री.ईब्राहीम पटेल :-** काय समजत नाहीये सभेला सुरूवात करा.
**श्री.नितीन बरडे :-** काय
**श्री.ईब्राहीम पटेल :-** काय ऊमजत नाहीये सभेला सुरूवात करा आणि पिठासीन अधिकाऱ्यांना दाखवा कुठे आहे तर
**श्री.अश्विन सोनवणे :-** हॅलो
**श्री.ईब्राहीम पटेल :-** आवाज येत नाहीये. दिसत नाहीये. आता आवाज येतोय दिसत नाहीये. अश्विनभाऊ , आवाज येत नाहीये , आवाज
**श्री.नितीन बरडे :-** भगतभाई ढेकळेदादा जॉईन झालेले दिसत नाहीये.
**श्री.राजेंद्र पाटील :-** आहेत ना भाऊ
**श्री.नितीन बरडे :-** काय वो दादा
**श्री.राजेंद्र पाटील :-** हे बघा माझ्या स्क्रिनवर बघा
**श्री.नितीन बरडे :-** दादा नमस्कार
**श्री.राजेंद्र पाटील :-** नमस्कार म्हणताहेत नितीनभाऊ
**श्री.सदाशिव ढेकळे :-** हो हो नमस्कार , नमस्कारभाऊ
**श्री.राजेंद्र पाटील :-** झाली का खात्री भाऊ
**श्री.नितीन बरडे :-** हो हो झाली राजुभाऊ
**श्री.सदाशिव ढेकळे :-** बोल भाऊ नितीन बोल
**श्री.नितीन लढ्ढा :-** हॅलो , हॅलो , कलेक्टर ऑफीस मध्ये नियोजन मंडळाच्या सभेमध्ये दोन चार विषय आहेत ती ऑफलाईन होती.
**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदय,
**श्री.नितीन लढ्ढा :-** हॅलो , हॅलो
**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदय, आवाज येतोय तुमचा भाऊ
**श्री.नितीन लढ्ढा :-** हॅलो , हॅलो महापौरताई , महापौरताई
**मा.महापौर :-** बोलाभाऊ
**श्री.नितीन लढ्ढा :-** हॅलो , हॅलो मी म्हंटल संपुर्ण सभागृहाच्या सदस्यांच्या भावना पाहाता आणि चाललेल्या गोंधळाची परिस्थिती पाहाता आपण सभा तहकुब करावी अशी माझी विनंती आहे आपणांस
**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदय, नितीनभाऊंनी
**श्री.भगत बालाणी :-** नितीनभाऊ जे म्हणताहेत त्याला आमचे
**मा.महापौर :-** सर्व सन्मा. सदस्यांनी शांतता राखायची आहे.
**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदय, नितीनभाऊंनी मांडलेल्या सुचनेला माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** बोला विष्णूभाऊ
**श्री.विष्णु भंगाळे :-** नितीनभाऊंनी जी सुचना मांडली त्यास आमच अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** बर ठिक आहे. झालेल्या गोंधळाच्या अनुषंगाने ही सभा तहकुब करण्यात येत आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** पुढची तारीख

**श्री.नितीन बरडे :-** भगतभाई , भगतभाई , अश्विनभाऊ

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौरताई

**मा.महापौर :-** तहकुब झालेल्या सभेची पुढील तारीख व वेळ आपणांस कळविण्यात येईल.

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौरताई आपण आदेश ऑलरेडी दिलेला आहे तरी सुध्दा मला एक मिनिटं बोलायची परवानगी मिळावी . महापौरताई ज्या पध्दतीने हे सगळं कामकाज सद्या महापालिकेमध्ये सुरू आहे. कायद्याची कशी पायमल्ली सुरू आहे. महापौरताई स्थायी समितीचे अधिकार हा त्यावर घाट घातला जातोय . महापौर ताई , महापौरताई

**श्री.नितीन बरडे :-** भगतभाई , सर्व सन्मा. सदस्यांनी

**मा.महापौर :-** सभा संपलेली असल्याने नगरसचिव यांनी राष्ट्रगीत सुरु करावे.

**नगरसचिव :**- सर्व सन्मा.सदस्यांनी राष्ट्रगीतसाठी उभे राहावे ही विनंती.

**राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा संपन्न झाली.**

**सही/-**

**(जयश्री सुनिल महाजन)**

**महापौर**

**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**